ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ८ जून, १९५५ | अंक २३

## विविध माहिती

**फळें टिकविण्याचा कारखाना**—उत्तर-प्रदेश सरकारनें नैनिताल जिल्ह्यांत रामगड ह्या ठिकाणीं फळें टिकविण्याचा कारखाना स्थापन केला आहे. उत्तर-प्रदेशांतील डोंगराळ भागांत फळांची पैदास वाढविण्याचाहि प्रयत्न सरकारकडून करण्यांत येत आहे. डबाबंद-फळें तयार करणारा वरील कारखाना काढण्यास २·६ लाख रुपये खर्च आला.

**खोबरें व खोबऱ्याच्या तेलाचा सुकाळ**—केरळ राज्यांत खोबरें व खोबऱ्याचें तेल ह्यांचा इतका सुकाळ झाला आहे कीं मागील हंगामांत झालेलें उत्पादनहि अद्याप बऱ्याच प्रमाणांत पडून आहे. राज्यांतील नारळाच्या बागाइतदारांच्या संघाचे अध्यक्ष ह्यांनीं असें सुचविलें आहे कीं, एक वर्षभर तरी खोबरें व खोबरेल तेल ह्यांच्या आयातींत कपात करण्यांत यावी.

**स्विस कंपनीची देणगी**—स्वित्झरलंडमधील एका औषधी कंपनीनें भारताला २,००,००० क्षयरोगनिरोधक गोळ्या भेट म्हणून पाठविल्या आहेत. दिल्ली व दिल्लीचीं उपनगरें येथील इस्पितळांना ह्या गोळ्या वाटून टाकण्यांत येतील. भारताच्या आरोग्यमंत्री, राजकुमारी अमृतकौर ह्यांनीं देणगीचा स्वीकार केला.

**हैड्रोजन बाँबचा शांततामय उपयोग**—रशिअन शास्त्रज्ञ हैड्रोजन बाँबच्या प्रचंड शक्तीचा उपयोग विधायक कामाकडे करून घेण्याचे प्रयत्न करीत आहेत, असें समजतें. ह्या शक्तीचा उपयोग धरणें बांधण्यासाठी, कालवे खणण्यासाठी अगर खाणी उपसण्यासाठी करतां येईल, असें त्यांचें म्हणणें आहे. दोन ग्रहांच्या दरम्यान प्रवास करण्यासाठींहि ही शक्ति वापरता येईल, असा त्यांचा अंदाज आहे.

**सर्पगंधा वनस्पतीची लागवड**—डेहराडून येथील जंगल-संशोधन-खात्यांतील श्री. रामस्वामी ह्यांच्याकडे देशांतील सर्पगंधा वनस्पतीची लागवड किती आहे तें तपासून पहाण्याचें काम भारतीय-सरकारनें सोपविलें आहे. उत्तर-बंगाल मधील डोंगराळ भागांत ह्या वनस्पतीची पद्धतशीर लागवड विस्तृत प्रमाणावर करण्याच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. ह्या वनस्पतीपासून वेडावर व इतर कांहीं रोगांवर गुणकारी औषधें तयार होतात.

**आंतरराष्ट्रीय व्यापार-प्रदर्शन**—येत्या सप्टेंबरच्या ११ तारखेपासून व्हिएन्ना येथें आंतरराष्ट्रीय व्यापार-प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. भारत सरकारनें प्रदर्शनांत भाग घेण्याचें ठरविलें आहे. दक्षिण भारतामधील कारखानदारांशीं ह्याबाबत सरकार विचारविनिमय करीत आहे.

**पाकिस्तानसाठी जपानी कापड**—अमेरिकेकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीचा भाग म्हणून पाकिस्तानला जपानकडून ९७,००,००० डॉलर्स किंमतीचें कापड मिळणार आहे. अमेरिका जपानला तेवढ्याच किंमतीचा कापूस देणार आहे.

**मुंबई ते मंगलोर रस्ता**—भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई व मंगलोर हीं शहरें जोडणारा रेल्वेरस्ता बांधण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे, असें रेल्वे-मंत्री श्री. लालबहादूर शास्त्री ह्यांनीं मरकारा येथें सांगितलें.

**१५ जागांसाठी १५,००० अर्ज**—सूडानच्या सरकारनें १५ शिक्षकांच्या जागांसाठी भारतामधील शिक्षकांकडून अर्ज मागविले होते. ह्या पंधरा जागांसाठी भारतामधून १५,००० अर्ज सुडान सरकारच्या शिक्षण-खात्याकडे गेले होते. अर्जदारांपैकी २० ते ३० अर्जदारांची दिल्लीला मुलाखत घेण्यांत येणार असून नंतर अखेरची निवड करण्यांत येईल.

**कलकत्ता-अंदमान विमान वहातूक**—भारतीय सरकारनें एअरवेज इंडिया कंपनीशीं करार करून कलकत्ता ते अंदमान अशी साप्ताहिक वैमानिक वहातूक सुरू करण्याचें ठरविलें आहे. कराराची मुदत ३ वर्षांची आहे. कलकत्त्यापासून बोटीनें प्रवास केल्यास अंदमानाला पोंचण्यास ३ दिवस लागतात. विमानानें हा प्रवास ६ तासांत होईल.

**सांगली एंजिनिअरिंग कॉलेजला गर्दी**—सांगली येथील न्यू एंजिनिअरिंग कॉलेजांत सिव्हिल, मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल एंजिनिअरिंग शिकणारे ११५ विद्यार्थीच घेण्याची परवानगी आहे. तथापि ह्या ११५ जागांसाठी १,००० विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते.

**शिवणाच्या यंत्राच्या सुया**—कलकत्ता येथील जय एंजिनिअरिंग वर्क्स ह्या कंपनीनें शिवणाच्या यंत्राच्या सुया तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्याची संपूर्ण यंत्रसामुग्री जर्मनीहून आणण्यांत येणार आहे. सुमारें एका वर्षाच्या आंत उत्पादनाला प्रारंभ होईल. कारखाना सुरू झाल्यावर देशांतील गरज तर भागेलच; पण कांहीं प्रमाणांत सुयांची निर्यातहि करतां येईल.

**मध्यभारतामधील साखरेचें उत्पादन**—मध्यभारतामधील साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी सरकार एक कमिटी नेमणार आहे, असें समजतें. मध्यभारतामधील साखरेचें सध्यांचें वार्षिक उत्पन्न ३ लाख मण आहे, तें ८ लाख मणापर्यंत वाढविण्याचा राज्य सरकारचा उद्देश आहे.

### भिलई येथील पोलादाचा संकल्पित कारखाना

रशिआच्या मदतीनें भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या कारखान्याच्या प्राथमिक कामाला प्रारंभ झाला आहे. कारखान्याचे सरकारनियुक्त मॅनेजर, श्री. एस्. एन्. मेहता भिलई गांवीं गेले असून कारखान्यासाठीं जरूर ती जमीन मिळविणें, घरें बांधणें, इत्यादी कामें ते चालू करीत आहेत. प्राथमिक कामासाठीं एक तात्पुरती कचेरीहि उघडण्यांत आली आहे. रशिआनें कारखान्याचे मुख्य एंजिनिअर म्हणून मि. क्राटेन्को ह्यांना पाठविलें आहे. त्यांना पोलादाच्या धंद्यांतील ६ तज्ज्ञांची मदतहि देण्यांत आली आहे. रशिअन तज्ज्ञांचा अहवाल येत्या डिसेंबर अखेर तयार होईल अशी अपेक्षा आहे. रशियातर्फें कोणत्या प्रकारची यंत्रसामुग्री पुरविण्यांत येईल तें तपासून पहाण्यासाठीं भारतीय तज्ज्ञांची एक तुकडी कारखाना उभारण्यापूर्वी रशिआचा दौरा करणार आहे. प्रत्यक्ष कारखान्याच्या उभारणीसाठी २६ चौरस मैल जागा लागेल व सुमारें २६ खेडीं उठवावीं लागतील. कारखान्याच्या आसपास बांधण्यांत येणारें नगर लक्षांत घेतलें तर सुमारें १०० चौरस मैल जागा लागेल, आणि ६०,००० लोकवस्ती जागेवरून दुसरीकडे न्यावी लागेल. सर्व कारखाना चालू होण्यास १९५९ ची अखेर उजाडेल. तथापि, त्यापूर्वी एक वर्षभर कारखान्यांत होऊं शकणाऱ्या एकूण पोलादाच्या उत्पादनापैकीं बरेंच पोलाद तयार होऊं लागेल. कारखान्याची प्रत्यक्ष जागा मध्यप्रदेशांतील रासपूर ह्या खेड्याजवळ आहे. पुढील वर्षाच्या जानेवारीपर्यंत ह्या ठिकाणीं हजारों तंत्रज्ञांची व अधिकाऱ्यांची रहाण्याची सोय करावी लागेल.

---

### भारताच्या विकासाच्या योजना

पश्चिम बंगाल फिनॅन्शिअल कॉर्पोरेशनची पहिली वार्षिक सभा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. बी. एम्. बिर्ला, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्ता येथें भरली होती. ह्या प्रसंगीं भाषण करतांना श्री. बिर्ला ह्यांनीं भारताच्या औद्योगिक विकासाविषयीं आपले कांहीं विचार बोलून दाखविले. ते म्हणाले कीं, देशाची आर्थिक भरभराट होण्यासाठीं कांहीं मूलभूत गोष्टी घडवून आणण्यांत आल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे, वाढत जाणाऱ्या कारखान्यांतून अधिकाधिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. असें झालें म्हणजे हे लोक अधिक पैसे मिळवूं लागतील आणि आपलें रहाणीचें मान सुधारतील. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची चर्चा करतांना ते म्हणाले, कीं आपला देश आज फार मोठ्या औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम पुरा होत आला असून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमावर अखेरचा हात फिरविण्यांत येत आहे. पुढील पांच वर्षांत अर्थव्यवस्थेच्या सार्वजनिक विभागांत सरकार ३,५०० कोटींहून अधिक रक्कम गुंतवेल अशीं चिन्हें दिसत आहेत. खाजगी विभागांत किती भांडवल गुंतविलें जाईल तें अद्याप निश्चित झालेलें नाहीं. तथापि, ह्या बाबतींत थोडाबहुत अंदाज करतां येण्यासारखा आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत गुंतविण्यांत येणाऱ्या एकूण भांडवलाचा अंदाज सुमारें ६,००० कोटी रुपयांच्यावर करण्यांत आला आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, खाजगी विभागांत गुंतविण्यांत येणाऱ्या भांडवलाचें प्रमाणहि बरेंच असेल.

---

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. १-८-० | रु. १-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार टक्के)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

---

## Deccan Institute of Commerce

**594, Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1955-56 Session on Thursday the 23rd June 1955. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. ( First Part )., G. D. C. & A., C. A. I. I. B., Shorthand, Typewriting Examinations. Morning or Evening Classes. Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-Graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

---

## B. M. College of Commerce, Poona—4

The College will open for the new academic year on 20th June 1955. Students desirous of taking the Commerce Course after their S. S. C. examination should apply immediately in the prescribed form with the admission fee of Rs. 32/-. The Prospectus giving detailed information about the courses and rules of admission to different classes can be obtained from the office for six annas.

Under new ordinances of the Poona University, a Commerce Graduate can appear for B. A. examination without keeping terms in an arts college. Graduates in Arts with Economics ( Special and Hons. ) of the Poona University can appear for the B. Com. examination after keeping two terms in this College.

T. M. JOSHI,
Principal.

# अर्थ

बुधवार, ता. ८ जून, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतांतील बँकिंगची १९५४ मधील प्रगति

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ३६ (२) ह्या कलमाखालील रिझर्व्ह बँकेचा १९५४ मधील बँकिंगविषयक वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. १९५३ ह्या वर्षाच्या मानानें १९५४ मध्यें बँकांजवळील आर्थिक सामर्थ्य वाढलें. शेडयूल्ड बँकांजवळील ठेवींत ९१ कोटी रुपयांची भर पडली. १९५३ मध्यें फक्त ८ कोटींनीं ठेवी वाढल्या होत्या. फाळणीनंतर बँकांकडील ठेवी कमी होण्याची प्रवृत्ति होती, तिला आतां पूर्ण-पणें आळा बसलेला आहे आणि पंचवार्षिक योजनेखाली सरकारी खर्चाची गति वाढत आहे, तिचें प्रतिबिंब ठेवींत दिसून येत आहे. बँकांनीं दिलेलीं कर्जें व सरकारी रोख्यांची त्यांची खरेदी, ह्या दोहोंतहि भरघोस वाढ झालेली आहे. बँकांनीं उद्योगधंद्यांना व व्यापाराला अधिक प्रमाणांत भांडवल पुरविलें, त्याला त्यांच्या स्वतःच्या जवळील ठेवी उपयोगी पडल्याच, पण त्याबरोबर त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडून फार मोठ्या प्रमाणावर मदत घेतली. ह्यापूर्वीं कोणत्याहि वर्षीं रिझर्व्ह बँकेनें इतकीं कर्जें बँकांना दिलेलीं नव्हतीं.

हिंदी शेडयूल्ड बँकांच्या वसूल भांडवल + रिझर्व्हज्‌मध्यें २० लक्ष रुपयांची वाढ झाली; १९५४ अखेर त्या सर्वांच्या वसूल भांडवलाची व रिझर्व्हज्‌ची बेरीज ६०.३ कोटी रुपये होती. ह्याप्रमाणेंच बिगर–शेडयूल्ड बँकांचे आंकडे पाहिले, तर त्यांच्या मालकीच्या भांडवलाची बेरीज १२.४ कोटी रुपये भरते. म्हणजे, एकूण हिंदी बँकांच्या वसूल भांडवल + रिझर्व्हपैकीं १७% बिगर–शेडयूल्ड बँकांचें आहे. ठेवींत वाढ झाल्याकारणानें, वसूल भांडवल व रिझर्व्हज् ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण १९५३ मध्यें १०.०% होतें तें १९५४ मध्यें ८.९% वर उतरलें. हिंदी शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत तें ८.१% व बिगर–शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत १९.२% होतें.

हिंदी शेडयूल्ड बँकांचें जें वसूल भांडवल आहे, त्याच्या ८४% इतके त्यांचे रिझर्व्हज् आहेत. बिगर–शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत हें प्रमाण ४९% आहे. १९५४ अखेर, २० शेडयूल्ड व ६७ बिगर–शेडयूल्ड बँकांचे रिझर्व्हज् त्यांच्या वसूल भांडवला-इतके किंवा त्यापेक्षा ज्यास्त होते; ह्या उलट २८ बँकांनीं (त्यांपैकी २ शेड्यूल्ड बँका) मुळींच रिझर्व्हज् काढलेले नव्हते.

कांहीं थोड्या प्रमुख बँकांच्याजवळ वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं मोठ्या प्रमाणावर केंद्रित झालेलीं आहेत. ५० लाखांपेक्षा ज्यास्त असें स्वतःचें भांडवल असलेल्या २५ मोठ्या शेडयूल्ड बँकांजवळ मिळून ५१.९ कोटी रुपयांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह असलेले आढळतात. बाकीच्या ४७ बँकांच्या तत्सम आंकड्यांची एकत्र बेरीज ८.४ कोटी रु. भरते.

### शेडयूल्ड बँकांच्या कांहीं प्रमुख आंकड्यांतील फेर–बदल

| वर्ष | वसूल भांडवल व रिझर्व्हज् | ठेवी | कर्जें |
|---|---|---|---|
| १९५३ | + ०.१ | + ८.३ | – ९.६ |
| १९५४ | – | + ९१.१ | + ५७.१ |

बँकांकडील ठेवींत ९१ कोटी रुपयांची वाढ झाली, त्यापैकी दोन तृतीयांश वाढ डिमांड ठेवींमध्यें होती. ह्या ९१ कोटी रुपयांपैकी ८० कोटी रुपये हिंदी शेडयूल्ड बँकांकडे आले. शेडयूल्ड बँकांच्या ठेवींतील वाढीचा तक्ता येथें दिला आहे.

### शेडयूल्ड बँकांजवळील ठेवी

(आकडे कोटी रुपयांचे)

| | | धंद्यांच्या ठेवी | वैयक्तिक ठेवी | इतर ठेवी | एकूण ठेवी |
|---|---|---|---|---|---|
| डिमांड | डिसें. ५३ | २१९ | ११३ | ८६ | ४१७ |
| | जून ५४ | २३४ | ११६ | ८३ | ४४३ |
| | डिसें. ५५ | २३५ | ११५ | ११४ | ४६४ |
| टाइम | डिसें. ५३ | ६७ | १४१ | ५९ | २६७ |
| | जून ५४ | ६३ | १४५ | ५९ | २६८ |
| | डिसें. ५४ | ८३ | १५४ | ६२ | २९९ |
| सेव्हिंग्ज | डिसें. ५३ | २ | १३३ | ४ | १३९ |
| | जून ५४ | २ | १३७ | ४ | १४३ |
| | डिसें. ५५ | २ | १४० | ४ | १४६ |
| एकूण | डिसें. ५३ | २८७ | ३८७ | १४८ | ८२३ |
| | जून ५४ | २९९ | ३९८ | १५६ | ८५४ |
| | डिसें. ५५ | ३२१ | ४०९ | १८० | ९१० |

बँकांनीं सरकारी रोख्यांत अधिक रकमा गुंतविल्या. शेडयूल्ड बँकांची गुंतवणूक १२ कोटींनीं व सर्व बँकांची मिळून गुंतवणूक १४ कोटींनीं वाढली. तथापि, ठेवीहि वाढलेल्या असल्यानें, ह्या गुंतवणुकीचें ठेवींशीं प्रमाण शेडयूल्ड बँकांच्या बाबतींत ४३.०% वरून ४०.२% वर उतरलें.

### शेडयूल्ड बँकांची रोख्यांत गुंतवणूक

(आकडे कोटी रुपयांचे)

| | डिसें. १९५३ | जून १९५४ | डिसें. १९५४ |
|---|---|---|---|
| १ सरकारी रोखे | ३३८ | ३३७ | ३५७ |
| मध्यवर्ती सरकारचे | ३०१ | ३०२ | ३२२ |
| राज्य सरकारांचे | ३७ | ३५ | ३५ |
| २ इतर स्वदेशीं गुंतवणूक | २९ | २९ | ३३ |
| ३ विदेशी रोखे | २३ | २२ | २४ |
| एकूण | ३९० | ३८९ | ४१४ |

१९५१ नंतर शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ अशी प्रथम १९५४ मध्येंच झाली. १९५३–५४ च्या प्रारंभींच्या तेजीच्या मोसमांत, शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत ९३ कोटी

(पृष्ठ १८३ वर चालू)

# THE BANK OF POONA LIMITED.

*Balance Sheet as at 31st December, 1954.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Capital** | | | |
| Authorised Capital<br>50,000 Shares of Rs. 100/–each | ... | 50,00,000—0—0 | |
| Issued Capital<br>25,000 Shares of Rs. 100/–each | ... | 25,00,000—0—0 | |
| Subscribed Capital<br>25,000 Shares of Rs. 100/–each | ... | 25,00,000—0—0 | |
| Amount Called up<br>at Rs. 50/–per Share | ... | 12,50,000—0—0 | |
| Less calls unpaid | ... | Nil | |
| Add Forfeited Shares | ... | Nil | 12,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** | ... | | 34,000—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | | |
| Fixed Deposits | ... | 8,72,353—0—0 | |
| Savings Bank Deposits | ... | 6,69,598—5—4 | |
| Current Accounts & Contingency Accounts, etc. | ... | 6,28,145—7—4 | 21,70,096-12—8 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | | |
| (1) In India | ... | Nil | |
| (2) Outside India | ... | Nil | |
| **Particulars:** | | | |
| (1) Secured | ... | Nil | |
| (2) Unsecured | ... | Nil | Nil |
| **5. Bills Payable:** | ... | | 25,405—5—9 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per Contra** | | | |
| (1) Payable in India | ... | 1,06,949—7—3 | |
| (2) Payable Outside India | ... | Nil | 1,06,949—7—3 |
| **7. Other Liabilities:** | | | |
| (1) Provision for Income-Tax | ... | 1,806—3—0 | |
| (2) Branch adjustment | ... | 6,855—9—3 | |
| (3) Outstanding Liabilities for Expenses | ... | 111-15—0 | |
| (4) Income received in advance | ... | 98—0—0 | 8,871-11—3 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra** | ... | | Nil |
| **9. Profit and Loss Account:** | | | |
| Profit as per last Balance Sheet | ... | 1,215-13—4 | |
| Less appropriations:<br>To Reserve Fund | ... | 500—0—0 | |
| | | 715-13—4 | |
| Add profit for the year brought from the Profit and Loss A/c., | ... | 2,417-13—2 | 3,133-10—6 |
| **10. Contingent Liabilities**<br>Nil | | | |
| Total Rs. | ... | | 35,98,456-15—5 |

D. R. Naik, *Chairman*

N. B. Parulekar, F. P. Pocha, G. K. Naik — *Directors.*

K. D. Joglekar, *Accountant.*

G. G. Sathe, *Manager.*

# THE BANK OF POONA LIMITED.

***Balance Sheet as at 31st December 1954***

## PROPERTY AND ASSETS

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including foreign currency notes) ... | | | 4,40,947—3—3 |
| **2. Balances with Other Banks** (On current account) | | | |
| (1) In India ... | | 3,05,764-14—7 | |
| (2) Outside India ... | | Nil | 3,05,764-14—7 |
| **3. Money At Call And Short Notice** ... | | | 50,000—0—0 |
| **4. Investments** (at book value) | | | |
| (1) Securities of the Central and State Governments and other Trustee securities including Treasury Bills of the Central and State Governments. of the face value of Rs. 601,300/- (Market Value Rs. 5,47,492-6-0) ... | | 5,99,202—4—0 | |
| (2) Shares- Ordinary fully paid (Market value Rs. 4,240-4-9) ... | | 5,911—8—6 | |
| Partly paid ... | | Nil | |
| Deferred fully paid ... | | Nil | |
| (3) Debentures or Bonds. ... | | Nil | |
| (4) Other Investments. ... | | Nil | |
| (5) Gold. ... | | Nil | 6,05,113-12—6 |
| (Govt. Securities of the face value of Rs. 3,00,000/- are lodged with other Banks for advance facilities)... | | | |
| **5. Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors subject to particulars under clause 4 below) ... | | | |
| (1) Loans, Cash-Credits, Over-drafts, etc. | | | |
| (1) In India | 19,94,215—8—4 | | |
| (2) Outside India | Nil | 19,94,215—8—4 | |
| (2) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | | |
| (1) Payable in India | 22,187-14—0 | | |
| (2) Payable outside India. | Nil | 22,187-14—0 | 20,16,403—6—4 |
| **Particulars Of Advances** (*See Page 183*) | | | |
| **6. Bills Receivable, being Bills for Collection as per Contra** | | | |
| (1) Payable in India ... | | 1,06,949—7—3 | |
| (2) Payable outside India ... | | Nil | 1,06,949—7—3 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations, as per contra** ... | | | Nil |
| **8. Premises Less Depreciation** ... | | | Nil |
| **9. Furniture and Fixtures Less Depreciation:** | | | |
| At cost as per last Balance-sheet ... | | 48,512—0—0 | |
| Additions during the year ... | | 2,095—0—0 | |
| | | 50,607—0—9 | |
| Less Depreciation up to 31-12-1953 | 13,996—0—9 | | |
| For the year | 2,192—0—0 | 16,188—0—9 | 34,419—0—0 |
| **10. Other Assets Including Silver:** ... | | 19,000—0—0 | |
| 1. Land at cost | 11,854—8—0 | | |
| 2. Vehicle at cost | 5,400—0—0 | | |
| Less sales | 6,454—8—0 | | |
| Add profit on sale of Motor car | 436—0—0 | | |
| | 6,890—8—0 | | |
| Less depreciation upto 31-12-54 | 6,253—8—0 | 637—0—0 | |
| 3. Stationary stock ... | | 2,190—0—0 | |
| 4. Stamps ... | | 266—8—6 | |
| 5. Interests accrued on Investments ... | | 5,703—1—0 | |
| 6. Tax deducted at source ... | | 4,209-14—0 | |
| 7. Prepaid Expenses ... | | 325—0—0 | |
| 8. Income due but not received ... | | 260—0—0 | 32,591—7—6 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | | 6,267-12—0 |
| Total Rs. ... | | | 35,98,456-15—5 |

# THE BANK OF POONA LIMITED.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet on page 181**

| | Particulars of Advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| (1) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 12,36,296—2—10 |
| (2) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' personal security. ... | 6,37,759—5—3 |
| (3) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the Debtors. ... | 4,347-14—3 |
| (4) | Debts considered doubtful or bad, not provided for. ... | 1,38,000—0—0 |
| | | 20,16,403—6—4 |
| (5) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | 1,47,803—9—0 |
| (6) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members. ... | 1,86,500—6—7 |
| (7) | Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 3,57,665—9—0 |
| (8) | Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies, as members. ... | 3,58,446—8—9 |
| (9) | Due from Banking Companies. ... | Nil |

***Profit and Loss Account for the Year ending 31st December, 1954***

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME : (Less provision made during the year for bad and doubtful debts & other-usual or necessary provisions) Cr. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| Interest paid on Deposits, borrowings, etc. ... | 41,196-10—2 | Interest and Discount. ... | 1,06,060—1-10 |
| Salaries and Allowances and Provident Fund. ... (1) Manager 6,920—0—0 (2) Staff 36,549—3—0 | 43,469—3—0 | Commission, exchange & brokerage. | 4,952—6—3 |
| Directors' & Local Committee Members' fees and allowances. ... | Nil | Rents. ... | Nil |
| Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 7,955—7—9 | Net profit on sale of investments, gold and silver, land premises, and other assets. (not credited to reserves or any particular fund or account). | 436—0—0 |
| Law charges. ... | 3,328-11—3 | | |
| Postage, Telegrams and Stamps... | 3,500—2—9 | Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to reserves or any particular fund or account.) ... | Nil |
| Auditors' fees. ... | 1,000—0—0 | | |
| Depreciation on and repairs to the Banking Company's property | 2,425—1—0 | | |
| Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 4,516-10—3 | Income from Non-Banking assets, and profit from sale of or dealing with such assets. ... | 90—0—0 |
| Loss from sale of or dealing with non Banking assets. ... | Nil | | |
| Other expenditure. ... | 4,310—4—0 | Other receipts ... | |
| Balance of profit (Subject to taxation). ... | 2,417-13—2 | Share Transfer fee, locker rent and other miscellaneous receipts ... | 2,581—7—3 |
| Total Rs. ... | 1,14,119-15—4 | Total Rs. ... | 1,14,119-15—4 |

D. R. Naik, *Chairman.*

N. B. Parulekar, F. P. Pocha, G. K. Naik — *Directors.*

K. D. Joglekar, *Accountant.*

G. G. Sathe, *Manager.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of Bank of Poona Ltd., as at 31st December 1954 and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited returns from Branches and report that :—

(a) We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory, (b) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank, (c) The returns received from Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of the audit. (d) In our opinion the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law. (e) Such Profit and Loss Account, shows a true balance of profit for the year subject to inclusion of Rs. 4,184-1-0 of interest on debts classified doubtful, (f) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of affairs of the Bank according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank, and (g) In our opinion books of account have been kept by the Bank as required by Section 130, of the Indian Companies Act. 1913.

Poona,
21st March 1955.

P. G. BHAGWAT,
*Chartered Accountants.*

( पृष्ठ १७९ वरून चालू )

रुपयांची वाढ झाली. एप्रिल ते ऑक्टोबर ह्या मंदीच्या मोसमांत, दिलेल्या कर्जांत फक्त ५४ कोटींची घट झाली. मंदीच्या काळांत १९५३ च्या मानानें फारच कमी घट झाली. एकूण कर्जांत हिंदी शेड्यूल्ड बँकांचा वाटा दोन तृतीयांश, एक्सचेंज बँकांचा एक चतुर्थांश आणि बिगर–शेड्यूल्ड बँकांचा ७% एवढा आहे. ठेवींपेक्षाहि ज्यास्त कर्जें ज्यांनीं दिलीं आहेत, अशा कांहीं बिगर–शेड्यूल्ड बँका आहेत. तीन चतुर्थांश बिगर–शेड्यूल्ड बँका व एक तृतीयांश शेड्यूल्ड बँका ह्यांनीं ठेवींच्या ७०% कर्जें दिलेलीं आहेत. एकूण कर्जापैकी कारखानदारांस एक तृतीयांश व व्यापारास एक द्वितीयांश कर्जें मिळालेलीं आहेत.

पांच कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या १८ मोठ्या हिंदी शेड्यूल्ड बँकांचीं नफा–तोटापत्रकें पाहिलीं, तर त्यांचें उत्पन्न २·६ कोटींनीं वाढून तें ३१·२ कोटी रु. झालें. खर्च २·२ कोटी रुपयांनीं वाढला. म्हणजे, निव्वळ नफा ४० लाखांनीं वाढून त्याची रक्कम ५·३ कोटी रुपये झाली.

**१८ मोठ्या हिंदी शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न–खर्च**

| | १९५३ | १९५४ | १९५३ | १९५४ |
|---|---|---|---|---|
| | ( कोटी रु. ) | | ( एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % ) | |
| १ ठोक उत्पन्न | २८·६ | ३१·२ | — | — |
| (अ) व्याज, डिस्कौंट | २२·२ | २४·० | ७८ | ७७ |
| (ब) इतर | ६·४ | ७·२ | २२ | २३ |
| २ एकूण खर्च | २३·७ | २५·९ | ८३ | ८३ |
| (अ) ठेवींवर व्याज | ७·८ | ९·० | २७ | २९ |
| (ब) नोकर खर्च | ११·९ | १२·६ | ४२ | ४० |
| (क) इतर खर्च | ४·० | ४·३ | १४ | १४ |
| ३ निव्वळ नफा | ४·९ | ५·३ | १७ | १७ |

### श्री. बी. टी. ठाकूर ह्यांची निवृत्ति

दि युनायटेड कमर्शिअल बँक लिमिटेडचे जनरल मॅनेजर, श्री. बी. टी. ठाकूर, हे गेले दोन महिने आजारी असून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यांत आली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यावरून, त्यांनीं निवृत्तिपूर्वीची रजा घेतली असून रजेनंतर ते पूर्णपणें निवृत्त होतील. सुमारें ३५ वर्षें त्यांनीं हिंदी बँकिंगची उत्कृष्ट सेवा केलेली आहे. युनायटेड कमर्शिअल बँकेची, १९४३ मध्यें, कांहीं प्रमुख हिंदी उद्योगपतींनीं श्री. जी. डी. बिर्ला ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापना केली तेव्हां श्री. ठाकूर ह्यांना तिचे पहिले जनरल मॅनेजर नेमण्यांत आलें. युनायटेड कमर्शिअल बँकेस पहिल्या चार जॉइंट स्टॉक बँकांत स्थान मिळालें आहे, त्याचें मोठें श्रेय श्री. ठाकूर ह्यांनाच आहे. बँकेनें भारतांतच नव्हे, तर भारताबाहेरहि आपला व्याप पसरविला आहे. श्री. ठाकूर ह्यांच्या जागीं श्री. एस्. टी. सदाशिवन् ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. पूना बँकिंग असोसिएशनच्या १९५३ मधील व्याख्यानमालेचें पहिलें पुष्प त्यांनीं गुंफिलें होतें व ' बँकर्स ॲन्युअल नंबर, १९४३ ' चें प्रकाशन त्यांच्या हस्तें झालें होतें, हें पुण्यांतील बँकर्सच्या स्मरणांत असेलच. त्यावेळीं, त्यांच्या व्यक्तित्वाची, दुरदृष्टीची व आत्मविश्वासाची प्रचीति उपस्थितांना आल्याविना राहिली नाहीं. श्री. ठाकूर ह्यांचे हातून हिंदी बँकिंगची आणखी व्यापक सेवा घडण्यासाठीं त्यांना लवकर आराम लाभो व दीर्घायुष्य मिळो, असें आम्हीं चिंतितों.


सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,२९,०००
रिझर्व रु. ६,०५,६००
ठेवी रु. १,२६,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
★ शाखा: दादर, माहीम, बेळगाव, पुणे ★


### दि बँक ऑफ इंडिया लि.

दि बँक ऑफ इंडिया लि. ला येत्या वर्षी ५० वर्षें पुरीं होतात. त्या निमित्तानें बँक प्रत्येक पांच शेअर्सला एक बोनस शेअर देईल किंवा प्रत्येक शेअरला १ रु. जादा डिव्हिडंड देईल, अशी बातमी पसरली आहे. गेल्या वर्षी बँकेनें ५० रु. च्या प्रत्येक शेअरला ७ रु., म्हणजे १४% डिव्हिडंड दिलेलें आहे.

### पारनेर येथें सेक्रेटरींच्या शिक्षणवर्गाचा उद्घाटन समारंभ

पारनेर येथें सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या शिक्षणवर्गाचा उद्घाटनसमारंभ ता. १० मे रोजीं तेथील मामलेदार, श्री. आर. एन्. चक्रनारायण, ह्यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला.


**THE CO-OPERATIVE TRAINING COLLEGE,**

*5, Byramjee Jeejeebhoy Road, Poona - 1*

**NOTICE**

The College re-opens on 1st July 1955. University graduates are admitted to the course for Higher Diploma in Co-operation.

The students who obtained the Higher Diploma in Co-operation from this College have, in the past, ordinarily not found it difficult to secure employment in the Co-operative Department or co-operative institutions.

In direct recruitment to subordinate co-operative service in the Co-operative Department, the Government of Bombay give preference to candidates who have obtained the Higher Diploma in Co-operation. Co-operative institutions are also ordinarily expected to do likewise.

Three scholaraships of Rs. 20/- per month each are available.

The number of admissions are limited. Applications with the tuition fees of Rs. 75/-for the first term should reach the Principal by 20th June 1955.

For prospectus and form of application for admission, write to the Principal.

### गो. स. पारखे औद्योगिक मान–पारितोषिकें

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इण्डस्ट्रीजतर्फे प्रतिवर्षी संयुक्त महाराष्ट्रांतील कल्पक व होतकरू कारखानदारांना देण्यांत येत असलेल्या गो. स. पारखे औद्योगिक मान–पारितोषिकांसाठी १९५५ सालीं सात अर्ज चेंबरकडे आले होते. या वस्तूंचें परीक्षण करून चेंबरच्या पारितोषिक समितीनें प्रत्येकी रु. १०० चीं तीन पारितोषिकें पुढील वस्तूंना देण्याची शिफारस केली आहे.

(१) मुद्रण साहित्य भांडार, पुणें – सर्व्हिस रोलर कांपोझिशनसाठीं.

(२) इलेक्ट्रॉनीं कंट्रोल, पुणें – इलेक्ट्रॉनिक क्रोनोस्कोपसाठीं.

(३) शोनान प्रॉडक्टस्, पुणें – स्वांद् मलम.

यशस्वी कारखानदारांना वरील पारितोषिकें देण्याचा समारंभ चेंबरच्या गु. प्र. ओगले सभागृहांत दिनांक १६ जून, १९५५ रोजीं होणार आहे.

---

**लातूर येथें तांत्रिक शिक्षणाचें कॉलिज**—हैद्राबाद राज्यांतील लातूर ह्या गांवीं तांत्रिक शिक्षण देण्यासाठी एक कॉलेज स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच गांवचे एक उद्योगपति श्री. लाहोटी ह्यांच्या स्मरणार्थ तें काढण्यांत येत आहे. लातूर येथील प्रमुख नागरिकांनीं व व्यापाऱ्यांनीं कॉलेजसाठी ५०,००० रुपयांची रक्कम जमविली आहे.

**टाटा मेमोरिअल इस्पितळ**—मुंबई येथील टाटा मेमोरिअल इस्पितळ भारतीय सरकारचें आरोग्यखातें ४४·५ लाख रुपये देऊन आपल्याकडे घेणार असल्याचें कळतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आरोग्यविषयक जो कार्यक्रम आखण्यांत आला आहे, त्यांत वरील घटना सूचित करण्यांत आली आहे. इस्पिताळांतील खाटांची संख्या दुप्पट करण्यांत येणार आहे.

**भावनगर–अहमदाबाद टेलिफोन**—भावनगरहून अहमदाबादला स्वतंत्रपणें टेलिफोन करण्याची व्यवस्था चालूं झाली आहे. आतांपर्यंत राजकोटच्या द्वारांच अहमदाबादला टेलिफोन करतां येत असे. ह्या जुन्या व्यवस्थेमुळें टेलिफोन मिळण्यास उशीर लागतो अशी तक्रार व्यापारी वर्गातर्फे करण्यांत आली होती.

**जर्मनी व इजिप्त ह्यांच्यांत व्यापारी करार**—पश्चिम जर्मनीच्या सरकारचें एक व्यापारी प्रतिनिधि मंडळ इजिप्तला आलें आहे. इजिप्तकडून कापूस आयात करणें आणि इजिप्तच्या सरकारला आर्थिक विकासाच्या योजनेंत मदत करणें ह्या दोन विषयांवर प्रतिनिधी इजिप्त सरकाशीं वाटाघाटी करतील.

**विजेच्या आगगाड्यांचे डबे**—विजेच्या आगगाड्यांचे प्रवासी डबे कांहीं प्रमाणांत भारतांत प्रथमच तयार करण्यांत येणार आहेत. कलकत्ता येथील रेल्वेचे डबे तयार करणाऱ्या एका कारखान्याकडे १०० डब्यांची मागणी नोंदविण्यांत आली आहे. कलकत्त्यामधील उपनगरापर्यंत वहातूक करणाऱ्या विजेच्या रेल्वेवर ते वापरण्यांत येतील.

**बारडोली येथें साखरेचा कारखाना**—बारडोली येथें सहकारी तत्त्वावर चालणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या भागांतील ऊंस पिकविणाऱ्या ११४० शेतकऱ्यांनीं ५ लाख रुपये जमविले असून आणखी ७ लाख रुपये भाग–भांडवल उभें केलें आहे. कारखान्यांत साखरेचें उत्पादन पुढील वर्षाच्या अखेरपर्यंत होऊं लागेल.

### LORD REAY MAHARASHTRA INDUSTRIAL MUSEUM

The following new books have been received:—

(1) **The World of Honey Bee**—by Collin G. Butler, Publisher—Collins Publishers, 14 St. James Place, London, S. W. 1. pp. 223, Price—21 Sh. Nett.

(2) **Farming For Industry**—by R. O. Whyte, Director of the Commonwealth Bureau of Pastures and Field Crops. Publisher—Todd Publishing Group Ltd., London, pp. 160. Price 7 sh. 6 d.

(3) **Nuclear Physics**—by W. Heisenberg. Publisher—Methuen and Co., Ltd., 36 Essex Street, Strand, London W. C. 2. pp. 225. Price: 12 sh. 6 d. Nett.

(4) **The Dancing Bees**—by Karl Van Frisch. Publisher—Methuen & Co. Ltd., London pp. 183. Price: 16 Sh. Nett.

(5) **The Poor Man's Guide to Europe**—by David Dodge. Publisher—Random House, Inc. New York. pp. 307.

---

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.
९८० सदाशिव पेठ, पुणें २.

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं,

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेडच्या भागीदारांची विसावी वार्षिक सर्वसाधारण सभा टिळक स्मारक मंदिरांत (टिळक पथ, पुणें २) येथें रविवार ता. २६ जून १९५५ रोजीं दुपारीं ४ वाजतां भरविण्यांत येणार असून त्या वेळीं खालील कामांचा विचार होईल.

(१) ता. ३० सप्टेंबर १९५४ अखेर संपलेल्या वर्षाबद्दलचा डायरेक्टर्स यांचा अहवाल व ऑडिटर्स यांनीं तपासून बरोबर असा शेरा मारलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक स्वीकारणें.

(२) अहवालांत नमूद केलेलें डिव्हिडंड देण्यास मंजुरी देणें.

(३) निवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांच्या जागीं डायरेक्टर्स निवडणें (निवृत्त होणारे डायरेक्टर्स फेरनिवडणुकीस पात्र आहेत.)

(४) चालू वर्षाकरितां ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मेहेनताना निश्चित करणें.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांच्या हुकुमावरून

पुणें २,
दि. २९-५-१९५५.

सी. जी. आगाशे
अॅण्ड को.,
मॅनेजिंग एजन्टस.

सूचना—कंपनीचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें दि. १३ जून १९५५ ते दि. १२ जुलै १९५५ अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.